## निर्मिती अभियंत्यांच्या ५२ आठवड्यांच्या इंडक्शन लेव्हल ट्रेनिंग बॅच एन-३४ चा निरोप समारंभ




केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या (Central Electricity Authority, New Delhi) विद्युत अधिनियम १९५६ अन्वये ५२ आठवडयांच्या अभिक्रम अभ्यासक्रमा अंतर्गत एन-३४ बॅचचे २६ आठवडयांचे थिओरेटिकल प्रशिक्षण नाशिक निर्मिती प्रशिक्षण केंद्र येथे दिनांक १३.१०.२००८ ते ११.०४.२००९ या कालावधीत घेण्यात आले.

सदर प्रशिक्षण कार्यक्रमात नव्यानेच महानिर्मितीमध्ये रुजू झालेल्या २७ कनिष्ठ अभियंत्यांनी प्रशिक्षण घेतले. या अभ्यासक्रमात विविध विषयांवर तज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. क्लास लेक्चर्स तसेच ऑडियो-व्हिडीओ लेसन्स, सी.बी.टी., सिम्युलेटर, मॉडेल्स तसेच चंद्रपुर पॉवर स्टेशन मधील ५०० मेगावॅट क्षमतेचे विद्युत संच, पारस विद्युत केंद्रातील २५० मेगावॅट क्षमतेचे अत्याधुनिक विद्युत संच, राज्य विद्युत भार नियंत्रण केंद्र, कळवा, वायु वीज निर्मिती केंद्र, उरण, कोयना जल विद्युत केंद्र येथे शैक्षणिक भेटी आयोजित करून तेथील कामाची माहिती तज्ञांद्वारे देण्यात आली.

२६ आठवडयांच्या थेओरेटिकल प्रशिक्षणानंतर दिनांक ११.०४.२००९ रोजी प्रशिक्षणार्थीना त्यांच्या विद्युत केंद्रात पुढील २६ आठवडयांचे इन-प्लान्ट प्रशिक्षणासाठी मुक्त करण्यात आले. निरोप समारंभास नाशिक औ.वि.केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.एस.बी. खराबे उपस्थित होते.

या प्रसंगी श्री.पी.एम. चौधरी महाव्यवस्थापक, श्री.जी.एम.पचारे महाव्यवस्थापक, श्री.आर.व्ही. पाठक व श्री.सी.व्ही. पेटकर अधीक्षक अभियंते नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, यांची विशेष उपस्थिती लाभली.

प्रशिक्षणामुळे औष्णिक, जल व वायु विद्युत केंद्राविषयी सखोल माहिती मिळाली व त्यामुळे विद्युत केंद्रात काम करण्यासाठी आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचा अभिप्राय प्रशिक्षणार्थी अभियंत्यांनी व्यक्त केला.

कामातील त्रुटी अभ्यास करून दुर केल्या पाहिजेत तसेच प्लांट मधील मशिन ची सखोल गोळा करायला हवी असे उद्बोधन श्री.एस.बी. खराबे यांनी केले.

श्री.पी.एम. चौधरी यांनी नुकतीच जर्मनीला भेट दिलेली असून तेथील नविन औष्णिक विद्युत केंद्राबद्दल तंत्रज्ञान व त्यासंबंधीचे फोटो प्रशिक्षणार्थीना दाखविले.

मानव संसाधनाचा उपयोग आपण चांगल्या कामासाठी कसा करता येईल व जास्तीत जास्त वीज निर्मिती कशी होईल याकडे प्रशिक्षणार्थीनी लक्ष दयावे असे मत श्री.आर.व्ही. पाठक अधीक्षक अभियंता नाशिक औष्णिक विद्युत केंद्र यांनी नमुद केले.

पुढील काळात कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त वीज उत्पादन करून महाजेनकोचा उत्कर्ष करावा असे आव्हान श्री.एस.बी. भांदेकर, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) यांनी केले.

या निरोप समारंभाचे सुत्रसंचालन श्री.एस.आर.शिंदे व आभार प्रदर्शन श्री.जे.एम. इब्राहिम यांनी केले.

## परळी येथे ''महाराष्ट्र दिना'' निमित्त ध्वजारोहण



महाराष्ट्र दिनानिमित्त परळी येथे ध्वजारोहण करताना मुख्य महाव्यवस्थापक श्री.माधव पाऊलझगडे.

दिनांक १ मे २००९ रोजी औ.वि. केंद्र, परळी वैजनाथ येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ४९ व्या ''महाराष्ट्र दिना'' निमित्त सकाळी ८.०० वाजता मुख्य महाव्यवस्थापक श्री.माधव पाऊलझगडे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

तसेच १ मे २००९ ''कामगार दिना'' निमित्त औ.वि. केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ सकाळी ११.०० वाजता 'कामगार कायदेविषयक मार्गदर्शन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा.न्या.श्री.ए.डी. पळसपगार, अध्यक्ष, तालुका विधीसेवा समिती, परळी वैजनाथ हे लाभले होते. त्यांनी आपल्या भाषणांत कामगार कायदेविषयक बाबीवर सखोल मार्गदर्शन केले व कामगारांनी केवळ कायदेशीर संरक्षण आहे म्हणून निश्चित न राहता बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल अंगीकारावेत असे आवाहन केले. तद्नंतर न्या श्री.एम.एन. पाटील यांनीही सविस्तर विविध कामगार कायदयाची माहिती सांगितली. तसेच सौ.संगीता सानप, तहसीलदार यांनी सामाजिक उणीवेतूनच बाल कामगार प्रथा निर्माण झाली असून त्याचा प्रतिबंध करण्यासाठी सर्वांनी जागरूक असले पाहिजे असे सांगून उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुख्य महाव्यवस्थापक मा.श्री.माधव पाऊलझगडे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, बुद्धीजीवी बरोबरच श्रमजीवीचीही गरज आहे. कारखानदार व कामगार हे दोघे एकाच रथाची दोन चाके असून त्याशिवाय हा वीजनिर्मितीचा रथ पुढे चालू शकत नाही.

सदरहू कार्यक्रमास महाव्यवस्थापक श्री.अरूणकुमार शामकुल, अधीक्षक अभियंता श्री.आर.व्ही. तासकर, श्री.डोंगरे, श्री.मुरकुटे, श्री.येलगुंडी तसेच औ.वि. केंद्रातील अधिकारी, अभियंते, कर्मचारी कामगार, कंत्राटदार व कंत्राटी कामगार बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाची प्रस्तावना व आयोजन कल्याण अधिकारी श्री.चंद्रकांत राऊत यांनी केले. सुत्र संचालन श्री.महेंद्र शिंदे तर आभार प्रदर्शन श्री.मिश्रा यांनी केले.



मुख्य महाव्यवस्थापक (कार्य)मा.श्री.एस.जे. जाधव यांचा मुख्यालय येथे सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.सुब्रत रथो. सोबत संचालक सर्वश्री गिरासे, शेलार, डवलेकर, थोटवे व चौधरी आणि इतर अधिकारी व कर्मचारी.